# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**
**कंत्राटी पदभरती जाहीरात**

---

**दिनांक :-**

## -: थेट मुलाखत :-

उल्हासनगर महानगरपालिका, कार्यक्षेत्रात वैद्यकिय आरोग्य विभाग मार्फत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग् अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासाठी विविध संवर्गातील रिक्त पदांची , कंत्राटी पद्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण , नियुक्त ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम , अटी व शर्ती ह्या उल्हासनगर महानगरपालिका येथील संकेतस्थळ https//www.umc.gov.in. या संकेतस्थळावर प्रसिद्द करण्यात आलेले असून, इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना Download करून, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह दिनांक ०८/०९/२०२५ ते दिनांक १२/०९/२०२५ रोजी पर्यंत दुपारी १२.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, उल्हासनगर महानगरपालिका येथे थेट मुलाखतीकरिता उपस्थित रहावे.

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत रिक्त पदे (NUHM) थेट मुलाखत**
**(वेळ सकाळी ९.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत)**

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मायक्रोबायलॉजिस्ट | १ | MD Microbiology<br>MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ७५०००/- | ना.प्रा.आ. केंद्र | खुला - I |
| २ | वैद्यकिय अधिकारी **(पुर्ण वेळ)** | ५ | MBBS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ६००००/- | ना.प्रा.आ. केंद्र | अजा -१<br>अज-१<br>विजाअ-१<br>इ.मा.व.-१<br>खुला-१ |
| ३ | वैद्यकिय अधिकारी (अर्ध **वेळ**) (Part **Time**) | ६ | MBBS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ३००००/- | ना.प्रा.आ. केंद्र | बिंदुनामावली लागू नाही. |

## १५ वा वित्ता आयोग अंतर्गत रिक्त पदे (UHWC)
## (वेळ सकाळी ८.०० ते सांय. ४.०० वाजेपर्यंत)

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | २२ | MBBS<br>MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ६००००/- | अजा-२, अज-२, विजाअ -१, भजब-१, भजक- १, भजड-१, इमाव-३, आदुघ-३ खुला-८ |
| | | | BAMS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | Rs 25000/fixed Salary & Rs 15000/- Performance Incentive | |

## हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत रिक्त पदे (HBT)
## (वेळ दूपारी २.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत)

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | २ | MBBS<br>MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ६००००/- | अज-१, खुला-१ |
| | | | BAMS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | Rs 25000/fixed Salary & Rs 15000/- Performance Incentive | |

## १५ वा वित्त आयोग अंतर्गत रिक्त पदांचा तपशील (POLYCLINIC)

| अ क्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Physician (Medicine) | 2 | MD Medicine, DNB | **Incentive** To visit once in every week. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit+ Rs. 100 per patient checked of his/her speciality to maximum Rs. 5000- visit | POLYCLINIC /ना.प्रा.आ.केंद्र | मानसेवी पदे असल्यामुळे बिंदुनामावली लागु नाही. |
| 2 | Obstetrics & Gynaecologist | 3 | MD/MS Gyn/DGO/DNB | | | |
| 3 | Paediatrician | 3 | MD Paed/DCH/DNB | | | |
| 4 | Ophthalmologist | 4 | MS Opthalmologist/DOMS | To visit once in every fortnight. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit+ Rs. 100 per patient checked of his/her speciality to maximum Rs. 5000/- visit. | | |
| 5 | Dermatologist | 4 | MD(Skin/VD) DVD,DNB | | | |
| 6 | Psychiatrist | 4 | MS Pyschiatrist/DPM/ DNB | | | |
| 7 | ENT Specialist | 4 | MS ENT/DORL/DNB | | | |

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व १५ व्या वित्त आयोगांतर्गत उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचनां खालील प्रमाणे.**

१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान व १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात https://www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधरण सुचमा/माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

२) सर्व सूचनांचे काळजी पूर्वक वाचन करुन अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखती दरम्यान सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

३) अर्ज स्वीकारण्यात आला किवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही, निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमदेवाराची/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**अर्ज भरण्याबाबतच्या सुचना**

१. सर्व उमेदवारांनी खालील नमूद फार्म मध्येच अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. उमेदवारांने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

४. ज्या उमेदवाराना Grade System or CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावे. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५. जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांका पर्यंत असणारे वय दिवस महिने व वर्ष अचूक नमुद करावे.

६. अर्जात उमेदवारांचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

७. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

९. १५ वा वित्त आयोग अंतर्गत भरण्यात येणारी वैद्यकिय अधिकारी (BAMS) ही कंत्राटी स्वरूपाची असून नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधीकरिता राहील

१०. पदभरतीच्या आवश्यक सुचना व सुधारणा वेळोवेळी https://www.umc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

११. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लुएस) उमदेवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्रक्र.३१/१६/अ, दि. १२/०२/२०१९ व दि. ३१/०५/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१२. मागासवर्गीय उमेदवारानी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

१३. अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबत चे हमी पत्र देण्यात यावे.

१४. पुर्ण भरलेल्या अर्जाची स्वसाक्षांकित प्रत व सर्व कागदपत्रे, उल्हासनगर महानगरपालिका, वॉर रूम, दुसरा मजला येथे दिनांक ०८/०९/२०२५ ते दिनांक १२/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यत उपसिथत रहावे. उशिरा येणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

**अटी व शर्ती:**

**१. पदाचा प्रकार व नियुक्ती कालावधी**

१. वरील पदे ही केवळ कंत्राटी स्वरुपाची असून, त्यांची नियुक्ती दिनांक **२९/०६/२०२६** पर्यंत मर्यादित असेल.
२. सदर पदे ही राज्य शासनाची नियमित पदे नसून, केवळ कंत्राटी स्वरुपातील असतील. उमेदवारांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा, सेवा संरक्षण मिळवण्याचा अथवा नियमित सेवेचा कोणताही दावा करता येणार नाही.
३. ही पदे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातच असतील.

**२. पात्रता व शारीरिक स्थिती**

१. उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा.
२. उमेदवाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
३. अनुभव व उच्च शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
४. आवश्यक शैक्षणिक पात्रता नसल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

**३. मानधन व लाभ**

१. नमूद मानधन हे *एकत्रित* असून, त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय नसतील.
२. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना मानधन हे राज्यस्तरीय मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केले जाईल.

**४. वयोमर्यादा**

१. सामान्य उमेदवारांसाठी किमान वय १८ वर्षे, कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे, मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील.
२. वैद्यकीय अधिकारी/विशेषतज्ञ पदासाठी वयोमर्यादा ७० वर्षे, तर जीएनएम, एएनएम, औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बहुउद्देशीय कर्मचारी यासाठी ६५ वर्षे राहील.

३. वयाच्या ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या उमेदवारांनी, शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकितकांकडून घेऊन अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**५. शैक्षणिक अर्हता**

१) शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचूक तपशिल नोंद करावा.

२) मुलाखतीच्या कालावधीत उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आहे.

३) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी, ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४) अंतिम प्रमाणामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमूद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबंधित संस्थेकडून प्रमाणित करुण घ्यावे. मुलाखतीच्या वेळी ती सादर करावी.

५) उमेदवारांची अर्जामध्ये नमूद माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६) पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास सदरील उमदेवाराला अपात्र ठरविले जाईल.

७) पदाकरीता आवश्यक पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापिठासून प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

**६. अनुभव:-**

१) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय व निमशासकीय व खाजगी अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये, त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशिल नमुद करीत असताना ज्या शासकीय निम शासकीय व खाजगी कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच शासकीय, निमशासकीय खाजगी कार्यालयाचा तपशिल फॉर्ममध्ये नमुद करावा अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

३) अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशिल नमुद करताना रुजू दिनांक कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कलावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल

४) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेताना जाणार नाही.

### ७. संगणक अर्हता

MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

### ८. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र :-

१) लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात आली असून दि. २३/७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमदेवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र करणार नाहीत.

२) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीस पात्र उमदेवाराने मुलाखती दरम्यान सादर करणे अनिवार्य आहे.

### ९. उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी

१) उमेदवाराने अर्जामध्ये फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिक्टवावा फोटो स्टेपल करू नये.

२) स्वाक्षरी करीता राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

### १०. अर्ज व कागदपत्रे

१. उमेदवाराने अर्ज करताना पदाचे नाव, सामाजिक आरक्षण व प्रवर्ग (उदा. अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय) स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे.
२. एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करत असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
३. अर्जासोबत संबंधित कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र (रजिस्ट्रेशन) सादर करणे बंधनकारक राहील. बहुउद्देशीय कर्मचारी पदाव्यतिरिक्त सर्व पदांकरिता ही अट लागू आहे.
४. सर्व कागदपत्रे सद्य स्थितीत वैध असावीत. अपूर्ण/अवैध कागदपत्रांबाबत अर्ज अपात्र ठरेल.
५. अर्जामध्ये उमेदवारांनी अचूक मोबाईल क्रमांक, पत्ता व ईमेल आयडी नमूद करावा, जे भरती प्रक्रियेअखेरपर्यंत सुस्थितीत असावेत.
६. अर्ज अपूर्ण/अर्धवट असल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

### ११. आरक्षण व जात प्रमाणपत्रे

१. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी मान्यताप्राप्त जात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
२. जातीचे प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराला आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

### १२. भरती प्रक्रिया व जाहिरात अधिकार

१. जाहिरातीतील पदसंख्या, आरक्षण, दिनांक इत्यादी बाबतीत कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे राहतील.
२. भरतीसंदर्भातील सर्व सूचना www.umc.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क केला जाणार नाही.
३. नियुक्तीच्या वेळी किंवा पूर्वी मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. कागदपत्रांमध्ये तफावत आढळल्यास, किंवा दबाव तंत्र वापरण्यात आल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

४. नियुक्तीच्या ७ दिवसांत उमेदवाराने संबंधित ठिकाणी हजर राहणे बंधनकारक राहील.
५. निवड झाल्यानंतर उमेदवाराने रु.१००/- चा करारनामा (बॉण्ड पेपरवर) अटी मान्य असल्याचे नमूद करून सादर करणे बंधनकारक राहील.
६. कंत्राटी कालावधीत उमेदवारास स्थानबदलाची मागणी करता येणार नाही.
७. पूर्वीच्या सरकारी सेवेतून सेवा निवृत्त उमेदवारांनी संबंधित तपशील (रूजू दिनांक, कार्यकाळ, पदनाम, निवृत्ती दिनांक, अंतिम वेतन, पेन्शन) अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

**१३. प्रतीक्षा यादी व नियुक्ती**

१. भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वर्षभराच्या कालावधीत जर रिक्त पद निर्माण झाले, तर प्रतीक्षा यादीतील उमेदवारास नव्याने भरती प्रक्रिया न करता नियुक्ती दिली जाईल.
२. केंद्र/राज्य शासनाने पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ समाप्त केली जाईल.

**१४. निवड प्रक्रिया**

१) सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकारी मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२) उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. सहायक संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि. २६/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल, उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

१५) **थेट मुलाखतीसाठी गुणांकन पद्धती :-** अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, मायक्रोबायोलॉजिस्ट ,एपिडेमोलोजिस्ट, पुर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS) व अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS), ही पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

| अक्र | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knolwledge | १० |
| २ | Research & Academic Knowledge | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Ablities | १० |
| ५ | Experience | १० |
| . | a) For Govt. Experience | 2 marks for one year |
| | b) For private Experience | 1 marks for one year |
| | एकुण गुण | ५० |

1. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचे जा. क राआसोमं मनुष्यबळ पदभरती/10670-11016/2023 दि. 27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचनांनुसार मुलाखत पद्धतीने पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

2. मुलाखतीनुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश Mail द्वारे निर्गमित करण्यात येतील.

**१५ वा वित्ता आयोग अंतर्गत अर्जदारांकरिता सर्वसाधारण सुचना**

१) १५ वा वित्ता आयोग अंतर्गत पदे ही राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी संबधित नाही व भविष्यात सदर योजना अथवा कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजूरी न मिळाल्यास त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियाना मध्ये सामावून घेण्याचा दावा करता येणार नाही.

२) १५ वा वित्ता आयोग अंतर्गत पदे दवाखाने जसेजसे कार्यान्वित होतील तसतसे नियुक्ती आदेश देण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**१६. खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.**

१. पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
२. वयाचा पुरावा (१० वी गुणपत्रक)
३. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
४. कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
५. सद्याचे पासपोर्ट आकाराचे २ फोटो
६. आधारकार्ड
७. पॅनकार्ड
८. अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
९. राखीव संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र
१०. आरक्षणाच्या पदासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
११. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१२. शासकीय/ निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव असलेस अनुभव प्रमाणपत्र.
१३. MS-CIT प्रमाणपत्र
१४.लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१५.फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१६.अर्ज व आवश्यक कागदपत्रे एकाच लिफाफयात बंद करुन सादर करावे. सदर लिफाफयावर अर्ज केलेल्या महानगरपालिकेचे नाव, अर्जदाराचे नाव व पदाचे नाव नमूद करावे, महानगरपालिकेचे नाव नमूद न केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

**(स्नेहा करपे)**
**उप आयुक्त (वै.आ.वि.),**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम (NUHM)**
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत (HBT APLA DAWAKHANA)**
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत (UHWC)**
**Polyclinic**
**पदाचे नांव :-**

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा सांक्षाकिंत फोटो |
|---|

प्रती,
मा. आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर - ३

१) संपुर्ण नाव — मराठी — इंग्रजी(कॅपीटल लेटर)

१) आडनाव :- ---------------------------- ----------------------
२) स्वत:चे नाव :- --------------------------- ----------------------
३) वडीलांचे नाव:- --------------------------- ----------------------
४) पतीचे नाव :- -------------------------- ----------------------
५) आईचे नाव :- ----------------------- ------------------------

२) पत्रव्यवंहाराचा संपुर्ण पत्ता (पिनकोड सहित)

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक ------------------------------------------

४) ई-मेल आयडी ----------------------------------------------

५) जन्मतारीख ------------------------------------------------

६) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे. त्याप्रमाणे चौकटीमध्ये √ अशी खुण करावी.

| अनु. जाती | अनु जमाती | विजा अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र | इमाव | एसईबीस | ईडब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

**जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र :- होय/नाही**

७) **शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

८) **अनुभव**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

९) **आपणांविरूध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.**

| होय | नाही |
|---|---|
| | |

**१०) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.**

१) -----------------------------------------------

२) -----------------------------------------------

३) -----------------------------------------------

४) -----------------------------------------------

**११) अर्जदार महाराष्ट्रचा अधिवासी आहे का? होय/नाही**

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरूध्द कायदेशिर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**प्रतिज्ञापत्र**

**(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)**

**नमुना अ**

मी श्री/श्रीम ---------------------------------------------श्री.---------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------वर्ष राहणार------------------------------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी ----------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------------------(संख्या) इतकी मुल हयात आहे. यापैकी दिनांक ३१ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या------------ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर ३१ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

ठिकाण :-

दिनांक :-

**सही---------------------------**

(            )

# फौजदारी गुन्हा दाखल नसलेबाबतचे हमीपत्र

मी श्री/श्रीम/कुमारी ------------------------------------- वय -------------वर्ष सध्या राहणार-------------

असे लिहून देते/देतो की, या पत्यावर -------------वर्षापासून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझोविरूद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

**सही**---------------------------

( )